# शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

उस्मानपुरा, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर - 431005

फोन: (कार्यालय) (0240) 2334724 / 2360781 (A.O.) 2345936, (P) 2353644

website: www.gpabad.ac.in

E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in


---

जा.क्र.शातंनिछसं/पवि/२०२५/235 — दिनांक : ११/०७/२०२५

महत्वाची सुचना :-

विषय - शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी (Odd Semester) परीक्षेकरीता फक्त Backlog विषयांकरीता परीक्षा अर्ज व शुल्क भरणे बाबत.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी (Odd Semester) परीक्षा दि. २८/१०/२०२५ पासून नियोजीत असुन, ज्या विद्यार्थ्यांचे Backlog विषय आहेत, त्यांनी www.gpabadmis.in या पोर्टल वरुन स्वत:च्या लॉगिन (Login) मधून परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क रु. ८५०/- दिनांक ११/०७/२०२५ ते १९/०७/२०२५ या कालावधी मध्ये भरायचे आहे. तसेच Backlog Project Course असणारे विद्यार्थी यांना अतिरिक्त रुपये १५० -/शुल्क भरणे आवश्यक आहे.

दि. १९/०७/२०२५ पासुन नियमानुसार विलंब शूल्क आकारला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

परीक्षा शुल्क भरण्या करीता विद्यार्थ्यांनी खाली दिलेल्या प्रक्रियेचा अवलंब करावा.

१. www.gpabadmis.in या पोर्टल वर जाऊन लॉगिन (Login) करावे.
२. लॉगिन केल्यानंतर Exam Registration form या टॅब वर क्लिक करावे.
३. पुढील टप्प्यात स्क्रीनवर विद्यार्थ्यांचे Backlog विषय Display होतील.
४. विद्यार्थ्यांनी Backlog विषय तपासून प्रथम Submit करावे व नंतर Confirm करावे.
५. पुढील टप्प्यात स्क्रीनवर विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती दिसेल व खाली Pay Now टॅब दिसेल.
६. त्या नंतर Proceed या टॅबवर क्लिक केल्यानंतर परीक्षा शुल्क भरण्याकरीता QR Code Payment दिसून येईल .
७. विद्यार्थ्यांनी QR Code Scan करुन परीक्षा शुल्क भरुन प्रक्रिया पूर्ण करावी.
८. परीक्षा शुल्क भरुन झाल्यानंतर त्यांच्या Login मध्ये Fee Receipt या टॅबवर क्लिक केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याची पावती दिसून येईल. त्याची प्रत पुढील कार्यवाही करीता जतन करुन ठेवावी.

(PTO)

**विद्यार्थ्यांकरीता महत्वाच्या सूचना :**

- सर्व विद्यार्थ्यांनी दिलेल्या कालावधीतच म्हणजेच दि. ११/०७/२०२५ ते १९/०७/२०२५ या दरम्यान परीक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे.
- परीक्षा शुल्क भरण्याकरीता विद्यार्थी ज्या संगणक, फोन किंवा गॅझेट चा उपयोग करत आहे त्यामध्ये इंटरनेट कनेक्शन व्यवस्थित चालत आहे, याची खात्री करून घ्यावी अन्यथा शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.
- परीक्षा शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या लॉगिन मध्ये शुल्क भरल्याची पावती (Fee Receipt) दिसून येईल, पावती उत्पन्न झाल्यास परीक्षा शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असे समजावे.
- शुल्क भरल्याची पावती (Fee Receipt) प्रदर्शित न झाल्यावर विद्यार्थ्याने पूर्ण झालेल्या व्यवहाराचा स्क्रीन शॉट घ्यावा व त्याचे प्रिंट घेऊन अर्जासोबत परीक्षा विभागात श्री साळुंखे यांच्याकडे जमा करावी.
- परीक्षा शुल्क भरण्याचा व्यवहार अयशस्वी झाल्यास तुम्ही ज्या खात्यातून शुल्क भरले आहे त्या खात्यात बँक तुमचे पैसे 24 तासात परत करेल.
- विद्यार्थ्यांनी व्यवहार यशस्वी झाल्यास त्याचे शुल्क कोणत्या खात्यातून भरले गेले आहे याची नोंद ठेवावी.

सदरील सुचना विद्यार्थ्यांच्या लॉगिन मध्ये देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

GOVERNMENT POLYTECHNIC शासकीय तंत्रनिकेतन छत्रपती संभाजीनगर CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर

प्रत — १. सर्व विभागप्रमुख यांनी वरील परीपत्रक विभागातील नोटीस बोर्डवर प्रदर्शित करावे तसेच सर्व विद्यार्थ्यांच्या विशेषत: जे विद्यार्थी संस्थेत उपलब्ध नाहीत, अश्या विद्यार्थ्यांना विभागाच्या व्हॉटसअॅप गृपवर प्रसारित करावे व विद्यार्थ्यांना अवगत करुन दयावे. २. विद्यार्थी विभाग ३. वसतीगृह ४. ग्रंथालय ५. प्रा. एस. जी. चव्हाण यांनी संस्थेच्या वेब पोर्टलवर पदर्शित करणे साठी.